नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १६८ Issue - 168 | वार - रविवार दि. १५ नोव्हेंबर २०२६ Blow- Sunday Date 15 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

शेवटच्या चेंडूवर उडवला पाकिस्तानचा धुव्वा; भारताने नवव्यांदा पटकावला अंडर-१९ आशिया चषक

मोहित उल्वाने शेवटच्या चेंडूवर चौकार मारून विजय मिळवून दिला; मनल-मोहितची जोडी ठरली गेमचेंजर पार्टनरशीप

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ओमान : मोहित उल्वा याने शेवटच्या चेंडूवर विजयासाठी ३ धावांची गरज असताना चौकार ठोकत भारताला सनसनाटी विजय मिळवून दिला आहे. भारताने यासह पाकिस्तानवर १ विकेटने मात करत अंडर १९ आशिया कप २०२६ च्या ट्रॉफीवर आपलं नाव कोरलं आहे. उस्मान खान याने केलेल्या शतकाच्या जोरावर पाकिस्तानने भारतीय संघासमोर आशिया कप स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ३३८ धावांचं अवघड आव्हान ठेवलं होतं. भारताने हे आव्हान शेवटच्या चेंडूवर पूर्ण केलं. भारताने या विजयासह पाकिस्तानचा हिशोब चुकता केला. पाकिस्तानने भारताला गेल्या वर्षी याच स्पर्धेतील अंतिम सामन्यात पराभूत केलं होतं. त्यामुळे भारताला उपविजेता म्हणून समाधान मानावं लागलं होतं. तसंच भारताला गेल्या रविवारी साखळी फेरीत पाकिस्ताने पराभूत केलं होतं. मात्र भारताने आता पाकिस्तानवर १ विकेटने मात करत या दोन्ही पराभवांची अचूक परतफेड केली आहे.

कर्णधार लक्ष्य रायचंदानी आणि आर्यवीर सेहवाग या सलामी जोडीने भारताला विजयी धावांचा पाठलाग करताना अप्रतिम सुरुवात मिळवून दिली. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी ९५ धावांची भागीदारी केली. त्यानंतर आर्यवीर आऊट झाल्याने ही जोडी फुटली. आर्यवीरने ५८ चेंडूत ६१ धावांची खेळी केली. आर्यवीरचं हे या स्पर्धेतील सलग दुसरं आणि एकूण चौथं अर्धशतक ठरलं.

आर्यवीरनंतर मैदानात आलेल्या वीके विनीथ याच्यासह लक्ष्यने अर्धशतकी भागीदारी केली. या दोघांनी ५३ चेंडूत ५१ धावा जोडल्या. दोघेही चांगल्या लयीत खेळत होते. मात्र विनीथ आऊट झाला. विनीथने २४ धावा करुन मैदानाबाहेरचा रस्ता धरला. त्यानंतर पाकिस्तानच्या गोलंदाजांनी भारताच्या मधल्या फळीतील फलंदाजीला खिंडार पाडलं. पाकिस्तानने भारताला ठराविक अंतराने झटके दिले. आर्यन राजपूत याने १६ आणि यशबर्धन चौहान ९ धावांवर बाद झाले. त्यामुळे भारताची स्थिती ४ बाद १८६ अशी झाली. मात्र कर्णधार लक्ष्य याने एक बाजू लावून धरली होती.

यशबर्धन आऊट झाल्यानंतर लक्ष्यची साथ देण्यासाठी अन्वय द्रविड मैदानात आला. या दोघांनी भारताला काही वेळ सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र पाकिस्तानने भारताला ३७ व्या ओव्हरमध्ये सलग २ झटके देत जोरदार कमबॅक केलं. हसनैन अब्बास डार याने अली रझा याच्या बॉलिंगवर अप्रतिम कॅच घेत लक्ष्यला मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. लक्ष्यने भारतासाठी सर्वाधिक ८० धावा केल्या. त्यानंतर अन्वय दुसऱ्याच चेंडूवर रन आऊट झाला. अन्वयने १२ बॉलमध्ये १९ रन्स केल्या. पाकिस्तानने अप्रतिम



फिल्डींगच्या जोरावर भारताला २ झटके देत कमबॅक केलं. त्यामुळे भारताची स्थिती ३६.३ ओव्हरमध्ये ६ आऊट २१७ अशी झाली.

मनल चौहानची निर्णायक खेळी

मनल चौहान याने आर्यन सावसानी याच्यासह सातव्या विकेटसाठी २७ बॉलमध्ये ३४ धावा जोडल्या. भारताने आर्यनच्या रुपात सातवी विकेट गमावली. त्यांनतर काव्या पटेल आला तसाच माघारी परतला. काव्याला भोपळाही फोडता आला नाही. काव्या आऊट झाल्याने भारताचा स्कोअर ४१.३ ओव्हरमध्ये ८ आऊट २५२ असा झाला. त्यामुळे पाकिस्तानच्या विजयाच्या आशा वाढल्या. मात्र अजून क्लायमॅक्स बाकी होता.

मनलची साथ देण्यासाठी दहाव्या स्थानी मोहित उल्वा मैदानात आला. या दोघांनी एकेरी-दुहेरी धावा जोडल्या. तसंच संधी मिळेल तेव्हा फटकेबाजी केली. दोघांनी पाहता पाहता अर्धशतकी भागीदारी रचली. या भागीदारीमुळे भारताचं आव्हान कायम राहिलं. दोघांनी ३४ चेंडूत ५७ धावा जोडल्या. मात्र भागीदारीतील ३५ व्या चेंडूवर मनलच्या अप्रतिम खेळीचा शेवट झाला. ३२ चेंडूत ३ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने ४७ धावांची निर्णायक खेळी केली.

भारताचा १ विकेटने विजय

मनलच्या रुपात भारताने नववी विकेट गमावली. त्यामुळे पाकिस्तानला सलग दुसऱ्यांदा आशिया कप जिंकण्यासाठी १ विकेटची गरज होती. मात्र मोहित सी वेंकटा याच्यासोबतीने धैर्याने लढला आणि पाकिस्तानच्या तोंडातून विजयाचा घास हिसकावला. मोहितने दाखवलेली हिंमत आणि वेंकटाने दिलेल्या साथीमुळे सामना शेवटच्या ओव्हरपर्यंत गेला.

शेवटच्या ओव्हरमध्ये ८ धावांची गरज

भारताला विजयासाठी शेवटच्या ओव्हरमध्ये ८ धावांची आणि पाकिस्तानला फक्त १ विकेटची गरज होती. अहमद हुसैन शेवटची ओव्हर टाकायला आला. अहमदने पहिल्या चेंडूवर धाव दिली नाही. अहमदने टाकलेला दुसरा बॉल वाईड ठरला. त्यामुळे भारताला १ धाव मिळाली. त्यानंतर मोहित आणि उल्वा या दोघांनी पुढील ४ चेंडूंवर १-१ धाव घेत स्ट्राईक बदलली. त्यामुळे भारताला सहाव्या आणि शेवटच्या चेंडूवर ३ धावांची गरज होती. मोहित स्ट्राईकवर होता. चाहत्यांच्या हृद्याची धडधड वाढली. हुसैनने बॉल टाकला. मोहितने या चेंडूवर कडक चौकार लगावला आणि भारताला सनसनाटी विजय मिळवून दिला. या सनसनाटी विजयाचा ड्रेसिंग रुमपासून ते प्रत्येक चौका-चौकात जल्लोष पाहायला मिळाला.

मोहित उल्वा या विजयाचा हिरो ठरला. तसंच वेकंटा यानेही मौल्यवान साथ दिली. या दोघांनी १० व्या विकेटसाठी १६ बॉलमध्ये नॉट आऊट ३० रन्सची पार्टनरशीप केली. मोहितने २६ चेंडूत ५ फोर आणि ३ सिक्ससह नॉट आऊट ४९ रन्स केल्या. तर वेकंटाने नॉट आऊट ११ धावांचं योगदान दिलं. पाकिस्तानसाठी ५ गोलंदाजांनी एकूण ९ विकेट्स मिळवल्या. मात्र वेंकटा आणि मोहित जोडी फोडण्यात अपयशी ठरल्याने त्यांना उपविजेता म्हणून समाधान मानावं लागलंय.

ना सत्तेत जाणार, ना विलिनीकरण होणार, सुप्रिया सुळेंचा शब्द, म्हणाल्या, दादा होता तोपर्यंतच चर्चा, आता फुल्ल स्टॉप!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्याच्या राजकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा सुरू आहे. गाठीभेटी, चर्चा, बैठका या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवरती विलिनीकरणासंदर्भात वेगवेगळे दावे करण्यात येत होते. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांकडून वेगवेगळे दावे, वक्तव्ये करण्यात येत होती. अशातच दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत आणि एनडीएसोबत सत्तेत जाण्याच्या चर्चांवरती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन सविस्तरपणे भाष्य केलं आहे. यावेळी सुळे म्हणाल्या, एनडीए सोबत जाण्याची चर्चा नाही. जिथे चर्चा नाही तिथ कॉमा, फुलस्टॉप विषय येत नाही.

एसए लिहिला नाही तर त्याबाबत का बोलायचं? अशा शब्दात विलीनीकरणाच्या चर्चांना फुलस्टॉप लावला आहे.

पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, विलीनीकरणाच्या चर्चांचा मला आता कंटाळा आला आहे. माझा भाऊ (अजित पवार) होता तोपर्यंत विलिनकरणाची चर्चा होती, तारीखही ठरली होती. ज्या दिवशी माझा भाऊ गेला, त्या दिवशी विलीनीकरणाबाबत माझ्या मनात, माझ्या पक्षात फुल स्टॉप झाला, ज्या दिवशी संघटनेतील पदाधिकारी आणि माझा अजितदादा यांच्याशी चर्चा झाली होती. त्याचे व्हिडीओ पण तुम्ही दाखवले. माझा भाऊ होता तोपर्यंत विलीनीकरणाची चर्चा होती. ज्या दिवशी भाऊ गेला त्या दिवशी विलीनीकरणाला फुल स्टॉप झाला. आमच्याकडून एकही स्टेटमेंटनंतर केलेलं नाही. राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून जे स्टेटमेंट आली त्याला आम्ही काऊंटर केलेलं नाही. जे आमचं पुढे जायचं ठरलं होतं, ते अजितदादांसोबत ठरलं होतं. काही गोष्टी हृदयातूनही होतात, विलीनीकरणाच्या चर्चांवर आज जे काही आहे ते प्रश्न विचारुन टाका, आज काय ते होऊन जाऊ द्या. यापुढे मी विलिनिकरणावर बोलणार नाही. या चर्चांवरुन मला कंटाळा आला आहे, असंही सुप्रिया सुळेंनी स्पष्ट केलं.

राज्यातील पिढीजात कुंभार समाजाला सरकारचा मोठा दिलासा; माती उत्खननाच्या रॉयल्टीबद्दल महत्त्वपूर्ण निर्णय

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई: कुंभार समाजासाठी राज्य सरकारकडून महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. पिढीजात कुंभार समाजाला विटा, कौले आणि इतर पारंपरिक वस्तू तयार करण्यासाठी वर्षाला ७०० ब्रासपर्यंत माती उत्खननावर रॉयल्टीमध्ये सूट देण्यात आली आहे. रॉयल्टीमुळे कुंभार समाजाला सदर पारंपरिक वस्तू तयार करण्याचा खर्च परवडत नसे. त्यामुळी ही रॉयल्टी रद्द करण्याची मागणी केली जात होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वर्षाला ७०० ब्रासपर्यंत माती उत्खननावरील रॉयल्टी रद्द करण्याचा हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून कुंभार समाजाला देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत आता सर्वसमावेशक धोरण ठरवण्यात आलं आहे. गावातील तलाव, पाझर तलाव आणि शेतकऱ्यांच्या शेतातील माती किंवा गाळ स्वखर्चाने नेल्यास रॉयल्टी न आकारण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. या सवलतींचा लाभ घेण्यासाठी 'महाखनिज' प्रणालीवरून तहसीलदारांकडे अर्ज करून १५ दिवसांत पाच वर्षांची वैधता असलेले स्वतंत्र ओळखपत्र कुंभार समाजातील व्यक्तींना मिळवता येईल. याशिवाय माती उत्खनन आणि वाहतुकीचे परवाने ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार असून, वाहतुकीसाठी विनामूल्य पास मिळणार आहे.

कुंभार व्यावसायिकांसाठी जिल्हास्तरावर 'एक खिडकी योजना' राबवून सरकारी जागांवर क्लस्टर उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच औष्णिक विद्युत केंद्रांमधून पॉण्ड श सवलतीच्या दरात म्हणजेच प्रतिटन १०० रुपयांत उपलब्ध करून दिली जाईल.

या सर्व योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात येणार असून, यामध्ये समाजाच्या प्रतिनिधींना सहभागी करून घेण्यात येणार आहे. दरम्यान, सरकारच्या या निर्णयानंतर पिढीजात कुंभार समाजाकडून समाधान व्यक्त करण्यात येत असून सरकारच्या निर्णयाचं स्वागत करण्यात आलं आहे.



बिरसा मुंडा : आदिवासी अस्मिता व स्वातंत्र्यलढ्याचा नायक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा विविध समाजघटकांच्या त्याग, संघर्ष आणि बलिदानाने समृद्ध झालेला आहे. ब्रिटिश सत्तेविरुद्ध देशाच्या कानाकोपऱ्यात अनेक क्रांतिकारकांनी संघर्ष केला. या संघर्षामध्ये आदिवासी समाजाचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. जल, जंगल आणि जमिनीवरील पारंपरिक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी, ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणांविरुद्ध आवाज उठवण्यासाठी आणि आपल्या सामाजिक-सांस्कृतिक अस्मितेचे रक्षण करण्यासाठी आदिवासी समाजाने अनेक आंदोलने उभारली. या संघर्षाला व्यापक दिशा देणाऱ्या महान क्रांतिकारकांमध्ये भगवान बिरसा मुंडा यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांनी अत्यंत अल्पायुष्यात आदिवासी समाजामध्ये स्वाभिमान, सामाजिक जागृती, संघटनशक्ती आणि स्वातंत्र्याची भावना निर्माण केली. ब्रिटिश सत्तेविरुद्ध त्यांनी उभारलेला 'उलगुलान' अर्थात महाउठाव हा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी प्रतिकाराचा एक महत्त्वपूर्ण अध्याय आहे. बिरसा मुंडा यांचे जीवन म्हणजे अन्यायाविरुद्धचा संघर्ष, सांस्कृतिक अस्मितेचे संरक्षण आणि सामाजिक परिवर्तनासाठी केलेल्या अविरत प्रयत्नांची प्रेरणादायी गाथा आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी समाजाच्या योगदानाचा सन्मान करणे होय.

बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी तत्कालीन बंगाल प्रांतातील छोटानागपूर परिसरातील उलिहातू या गावात झाला. हे गाव आजच्या झारखंड राज्यातील खुंटी जिल्ह्यात आहे. त्यांचा जन्म मुंडा या आदिवासी समाजात झाला. त्यांचे बालपण अत्यंत साध्या आणि प्रतिकूल परिस्थितीत गेले. आदिवासी समाजाचे जीवन जंगल, जमीन, शेती, निसर्ग आणि सामुदायिक परंपरांशी घट्ट जोडलेले होते. निसर्गाच्या सान्निध्यात वाढलेल्या बिरसा मुंडा यांनी लहानपणापासूनच आपल्या समाजाच्या जीवनातील अडचणी, गरिबी, शोषण आणि अन्याय जवळून अनुभवला. आदिवासी समाजाच्या जीवनपद्धतीमध्ये सामूहिकता, परस्पर सहकार्य, निसर्गाविषयी आदर आणि सांस्कृतिक स्वायत्तता यांना विशेष महत्त्व होते. मात्र ब्रिटिश राजवटीच्या विस्तारानंतर या जीवनपद्धतीवर अनेक संकटे निर्माण झाली. जंगलांवरील निर्बंध, जमिनीच्या मालकीसंबंधी बदललेले नियम, सावकारांचे शोषण आणि बाहेरून आलेल्या जमीनदारांच्या हस्तक्षेपामुळे आदिवासी समाजाचे पारंपरिक अधिकार धोक्यात आले. या परिस्थितीने बिरसा मुंडा यांच्या मनात अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा निर्माण केली.

बिरसा मुंडा यांचे बालपण आणि शिक्षण यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीवर महत्त्वपूर्ण परिणाम झाला. त्यांनी स्थानिक पातळीवर प्राथमिक शिक्षण घेतले. पुढील शिक्षणासाठी त्यांचा काही काळ चाईबासा परिसराशी संबंध आला. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांना तत्कालीन सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचे आकलन होण्यास मदत झाली. ब्रिटिश प्रशासन, जमीनदार, सावकार आणि मिशनरी संस्थांच्या प्रभावामुळे आदिवासी समाजात होत असलेल्या बदलांचे त्यांनी निरीक्षण केले. आदिवासी समाजाच्या पारंपरिक जीवनपद्धतीवर होणारे आघात आणि त्यातून निर्माण होणारी अस्वस्थता त्यांच्या लक्षात आली. शिक्षणामुळे त्यांच्यात प्रश्न विचारण्याची वृत्ती विकसित झाली. समाजातील शोषणाची कारणे समजून घेऊन त्याविरुद्ध संघटित प्रयत्न करण्याची आवश्यकता त्यांनी ओळखली. त्यामुळे त्यांचे कार्य केवळ राजकीय विरोधापुरते मर्यादित राहिले नाही, तर सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या दिशेनेही विस्तारले.

ब्रिटिश राजवटीने छोटानागपूर प्रदेशातील पारंपरिक जमीनव्यवस्थेमध्ये हस्तक्षेप केल्यामुळे मुंडा समाजाच्या जीवनावर गंभीर परिणाम झाला. मुंडा समाजात प्रचलित असलेली 'खुंटकट्टी' ही पारंपरिक सामुदायिक जमीनव्यवस्था त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा आधार होती. या व्यवस्थेमध्ये एखाद्या वंशाने किंवा कुटुंबसमूहाने जंगल साफ करून शेतीयोग्य केलेल्या जमिनीवर त्यांचे पारंपरिक सामुदायिक अधिकार मान्य केले जात असत. ब्रिटिश प्रशासनाने महसूलवसुली आणि जमीनमालकीच्या नव्या पद्धती लागू केल्यामुळे या व्यवस्थेला धक्का बसला. बाहेरून आलेले जमीनदार, सावकार, कंत्राटदार आणि व्यापारी यांना आदिवासी समाजात 'दिकू' म्हणून संबोधले जात असे. या बाह्य घटकांच्या हस्तक्षेपामुळे आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी हळूहळू त्यांच्या हातातून जाऊ लागल्या. कर्जबाजारीपणा, अवाजवी महसूल, वेठबिगारी आणि आर्थिक शोषण यांमुळे आदिवासींचे जीवन अधिकच असुरक्षित बनले. स्वतःच्या जमिनीवर शेती करूनही त्यांना त्या जमिनीवरील अधिकार गमवावे लागत होते. या अन्यायकारक परिस्थितीविरुद्ध बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाला संघटित करण्याचा प्रयत्न केला.

बिरसा मुंडा यांच्या कार्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी सामाजिक आणि धार्मिक जागृतीला संघर्षाचा आधार बनवले. त्यांच्या मते, समाजाची प्रगती साधण्यासाठी केवळ बाह्य शोषणाविरुद्ध लढणे पुरेसे नव्हते, तर समाजातील अंतर्गत कमतरताही दूर करणे आवश्यक होते. त्यांनी आदिवासी समाजाला अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा, व्यसनाधीनता आणि परस्परांमधील मतभेदांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. स्वच्छता, नैतिक आचरण, एकता, आत्मसन्मान आणि सामूहिक जबाबदारी यांचे महत्त्व त्यांनी लोकांना पटवून दिले. आपल्या पारंपरिक संस्कृतीचा अभिमान बाळगावा आणि तिचे जतन करावे, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली उदयास आलेल्या धार्मिक-सामाजिक चळवळीला 'बिरसाइत' चळवळ म्हणून ओळखले जाते. या चळवळीमुळे मुंडा समाजात नव्या आत्मविश्वासाची निर्मिती झाली. समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या हक्कांविषयी जागरूक असावे आणि अन्यायाविरुद्ध एकजुटीने उभे राहावे, ही भावना त्यांनी रुजवली.



बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या आर्थिक शोषणाचा प्रश्न व्यापक राजकीय व्यवस्थेशी जोडला. ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांमुळे आदिवासींचे पारंपरिक अधिकार हिरावले जात असल्याची जाणीव त्यांनी लोकांना करून दिली. जमीन, जंगल आणि नैसर्गिक संसाधने ही आदिवासींच्या जीवनाचा आधार आहेत. त्यामुळे या संसाधनांवरील पारंपरिक अधिकारांचे संरक्षण करणे आवश्यक आहे, अशी त्यांची भूमिका होती. त्यांनी लोकांना स्वतःच्या हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या नेतृत्वामुळे छोटानागपूर परिसरातील आदिवासी समाजामध्ये स्वातंत्र्याची आणि आत्मनिर्णयाची भावना अधिक प्रबळ झाली. अन्याय सहन करणे ही नियती नसून संघटित प्रयत्नांतून परिस्थिती बदलता येते, हा आत्मविश्वास त्यांनी समाजामध्ये निर्माण केला. त्यामुळे बिरसा मुंडा हे केवळ क्रांतिकारक नव्हते, तर आदिवासी समाजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक पुनर्जागरणाचे प्रेरणास्थानही होते.

१८९० च्या दशकात बिरसा मुंडा यांचा प्रभाव आदिवासी समाजामध्ये वेगाने वाढू लागला. १८९४ मध्ये त्यांनी छोटानागपूर परिसरातील शेतकरी आणि आदिवासींना अन्यायकारक महसूलवसुलीविरुद्ध संघटित करण्याचा प्रयत्न केला. १८९५ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांना अटक केली आणि त्यांना कारावासाची शिक्षा झाली. मात्र कारावासातून मुक्त झाल्यानंतर त्यांचा संघर्ष थांबला नाही. उलट त्यांच्या विचारांचा प्रसार अधिक व्यापक झाला. त्यांनी आदिवासी समाजामध्ये पारंपरिक जमीनहक्क, सांस्कृतिक स्वायत्तता आणि सामाजिक प्रतिष्ठा यांविषयी जागृती निर्माण केली. त्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजामध्ये अन्यायकारक व्यवस्थेविरुद्ध संघटित होण्याची प्रक्रिया अधिक वेगाने पुढे गेली.

१८९९ ते १९०० या कालखंडात बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली झालेला उठाव 'उलगुलान' या नावाने इतिहासात प्रसिद्ध आहे. मुंडारी भाषेतील उलगुलान या शब्दाचा अर्थ मोठा उठाव किंवा महाउठाव असा होतो. हा उठाव केवळ ब्रिटिश अधिकाऱ्यांविरुद्धचा सशस्त्र संघर्ष नव्हता, तर आदिवासी समाजाच्या पारंपरिक अधिकारांचे संरक्षण, जमीनव्यवस्थेतील अन्यायाचा प्रतिकार आणि सामाजिक स्वायत्ततेच्या पुनर्स्थापनेसाठीचा व्यापक प्रयत्न होता. बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाला संघटित करून अन्यायकारक सत्तेविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. या आंदोलनात मुंडा समाजासह परिसरातील इतर आदिवासी समूहांचाही सहभाग होता. आंदोलनाचा विस्तार झाल्यामुळे ब्रिटिश प्रशासन अस्वस्थ झाले. ब्रिटिश सैन्याने आंदोलन दडपण्यासाठी कठोर कारवाई केली. अनेक आदिवासींना अटक करण्यात आली, काहींना प्राण गमवावे लागले आणि अनेक गावांमध्ये दडपशाही करण्यात आली. शस्त्रसामर्थ्य आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्यापुढे आदिवासींची साधने मर्यादित असली, तरी त्यांच्या संघर्षातील धैर्य आणि स्वाभिमान कमी झाला नाही.

उलगुलान चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे तिने आदिवासी समाजाच्या प्रश्नांना व्यापक राजकीय आणि सामाजिक स्वरूप दिले. जमिनीवरील अधिकार, आर्थिक शोषण, वेठबिगारी, सांस्कृतिक स्वायत्तता आणि परकीय सत्तेचे वर्चस्व या सर्व प्रश्नांचा परस्परसंबंध या आंदोलनातून स्पष्ट झाला. बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाला आपल्या हक्कांची जाणीव करून दिली. समाजातील एकजूट आणि सामूहिक प्रतिकाराच्या बळावर अन्यायकारक व्यवस्थेला आव्हान देता येते, हा विश्वास त्यांनी निर्माण केला. त्यामुळे उलगुलान हे केवळ एका प्रदेशापुरते मर्यादित आंदोलन राहिले नाही, तर भारतातील आदिवासी हक्कांच्या इतिहासातील प्रेरणादायी घटना ठरली. या आंदोलनाने पुढील काळात आदिवासी समाजाच्या जमीनविषयक आणि सामाजिक अधिकारांसाठी निर्माण झालेल्या संघर्षांना वैचारिक बळ दिले.

ब्रिटिश सरकारने बिरसा मुंडा यांच्या आंदोलनाचा बीमोड करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम राबवली. अखेर ३ फेब्रुवारी १९०० रोजी त्यांना अटक करण्यात आली. त्यांना रांची येथील कारागृहात ठेवण्यात आले. कारावासात असतानाच ९ जून १९०० रोजी वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूचे अधिकृत कारण कॉलऱ्याचा आजार असल्याचे नोंदवले गेले. त्यांचे आयुष्य अत्यंत अल्प असले, तरी त्यांनी आदिवासी समाजाच्या इतिहासावर अमीट ठसा उमटवला. अवघ्या पंचवीस वर्षांच्या आयुष्यात त्यांनी निर्माण केलेली सामाजिक जागृती, संघटनशक्ती आणि स्वातंत्र्याची प्रेरणा पुढील अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरली. एखाद्या व्यक्तीचे महत्त्व तिच्या आयुष्याच्या कालावधीवर नव्हे, तर तिने समाजासाठी केलेल्या कार्यावर आणि निर्माण केलेल्या परिवर्तनावर ठरते, याचे बिरसा मुंडा हे उत्तम उदाहरण आहेत.

बिरसा मुंडा यांच्या संघर्षाचा परिणाम पुढील काळातील आदिवासी जमीनविषयक कायदे आणि प्रशासकीय धोरणांवरही दिसून येतो. छोटानागपूर प्रदेशातील आदिवासींच्या पारंपरिक जमीनहक्कांच्या संरक्षणाच्या मागणीला त्यांच्या आंदोलनामुळे विशेष महत्त्व प्राप्त झाले. १९०८ मध्ये लागू झालेल्या छोटानागपूर कास्तकारी कायद्याने आदिवासींच्या जमिनींच्या हस्तांतरणावर काही महत्त्वपूर्ण निर्बंध घातले. या कायद्याच्या निर्मितीमागे आदिवासींचे दीर्घकालीन संघर्ष, जमीनविषयक प्रश्न आणि उलगुलानसारख्या आंदोलनांनी निर्माण केलेला दबाव महत्त्वाचा होता. हा कायदा केवळ बिरसा मुंडा यांच्या आंदोलनाचा एकमेव परिणाम नव्हता; मात्र त्यांच्या संघर्षाने आदिवासी जमीनहक्कांच्या प्रश्नाला मिळालेली ऐतिहासिक दिशा नाकारता येत नाही. त्यामुळे त्यांचे कार्य एका उठावाच्या इतिहासापुरते मर्यादित राहत नाही, तर आदिवासी अधिकारांच्या संरक्षणाच्या व्यापक प्रक्रियेशी जोडले जाते.

आजच्या भारतात बिरसा मुंडा यांच्या विचारांचे महत्त्व अधिक व्यापक झाले आहे. स्वातंत्र्यानंतर देशाने लोकशाही, सामाजिक न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित राज्यव्यवस्था स्वीकारली. भारतीय संविधानाने अनुसूचित जमातींच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी विशेष तरतुदी केल्या आहेत. संविधानातील पाचवी आणि सहावी अनुसूची, अनुसूचित जमातींसाठीचे राजकीय प्रतिनिधित्व, शैक्षणिक संधी आणि विविध कल्याणकारी योजना या आदिवासी समाजाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण आहेत. अनुसूचित क्षेत्रांमधील ग्रामसभांना अधिकार देणारा पंचायत (अनुसूचित क्षेत्रांचा विस्तार) अधिनियम, १९९६ अर्थात पेसा कायदा आणि अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अर्थात वनहक्क कायदा हे आदिवासींच्या सामुदायिक संसाधनांवरील आणि पारंपरिक अधिकारांच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे कायदे आहेत. या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे ही शासनव्यवस्थेची आणि समाजाची जबाबदारी आहे. बिरसा मुंडा यांनी ज्या अधिकारांसाठी संघर्ष केला, त्या अधिकारांचे लोकशाही मार्गाने संरक्षण करणे हीच त्यांच्या विचारांना खरी आदरांजली ठरेल.

महाराष्ट्राच्या संदर्भातही बिरसा मुंडा यांच्या विचारांचे महत्त्व विशेष आहे. राज्यातील नाशिक, पालघर, नंदुरबार, धुळे, ठाणे, गडचिरोली, चंद्रपूर, हिंगोली आणि अमरावती यांसारख्या जिल्ह्यांमध्ये विविध आदिवासी समुदायांचे वास्तव्य आहे. वारली, भिल्ल, कोकणा, महादेव कोळी, गोंड, कोरकू, अंध आणि इतर आदिवासी समूहांच्या स्वतंत्र सांस्कृतिक परंपरा, भाषा, लोककला आणि जीवनशैली आहेत. या समाजांनी जल, जंगल आणि जमिनीशी संबंधित पारंपरिक ज्ञान जतन केले आहे. शेती, औषधी वनस्पती, जैवविविधता, जलसंधारण आणि निसर्गसंवर्धन यांसंबंधीचे त्यांचे अनुभव आजच्या पर्यावरणीय संकटांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. मात्र विकासाच्या विविध प्रकल्पांमुळे विस्थापन, जमिनींचे हस्तांतरण, जंगलावरील निर्बंध, शिक्षणातील असमानता, आरोग्यविषयक समस्या आणि रोजगाराच्या मर्यादित संधी अशी आव्हाने आजही आदिवासी समाजासमोर आहेत. या प्रश्नांकडे केवळ कल्याणकारी योजनांच्या दृष्टीने न पाहता अधिकार, प्रतिष्ठा आणि सहभाग यांच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.

आदिवासी विकासाचा विचार करताना त्यांच्या परंपरा आणि संस्कृती यांचे जतन करणे तितकेच महत्त्वाचे आहे. विकासाच्या नावाखाली आदिवासींच्या भाषांचे, लोककलांचे, सण-उत्सवांचे आणि पारंपरिक ज्ञानाचे अस्तित्व नष्ट होता कामा नये. आदिवासी समाजाला विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेताना त्यांच्या स्वतंत्र सांस्कृतिक आवडीचा आदर राखणे आवश्यक आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांची उपलब्धता वाढवताना त्यांच्या गरजा, अनुभव आणि प्राधान्यक्रम यांना केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. विशेषतः आदिवासी महिलांच्या शिक्षणाला, आर्थिक स्वावलंबनाला आणि निर्णयप्रक्रियेतील सहभागाला प्राधान्य देणे गरजेचे आहे. आदिवासी महिलांचे श्रम, पारंपरिक ज्ञान आणि सामाजिक योगदान यांना योग्य प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. बिरसा मुंडा यांनी समाजातील एकता आणि आत्मसन्मानाचा जो संदेश दिला, तो आजच्या सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेशी सुसंगत आहे.

बिरसा मुंडा यांचे जीवन आजच्या तरुण पिढीसाठीही अनेक अर्थांनी प्रेरणादायी आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून समाजाच्या हितासाठी कार्य करणे, अन्यायाविरुद्ध निर्भयपणे आवाज उठवणे, स्वतःच्या संस्कृतीचा अभिमान बाळगणे आणि सामूहिक परिवर्तनासाठी प्रयत्न करणे हे त्यांच्या जीवनातून शिकण्यासारखे महत्त्वाचे गुण आहेत. आजच्या काळात शिक्षण आणि तंत्रज्ञानामुळे विकासाच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. मात्र या संधींचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत नसेल, तर विकासाची प्रक्रिया अपूर्ण राहते. आदिवासी तरुणांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्यविकास, रोजगार, उद्योजकता आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांच्या मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण, स्थानिक इतिहासाचे जतन आणि आदिवासी समाजाच्या योगदानाचे शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये योग्य प्रतिनिधित्व करणेही महत्त्वाचे आहे. बिरसा मुंडा यांचा इतिहास केवळ एका समाजाचा इतिहास नसून तो भारतीय स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठेच्या संघर्षाचा अविभाज्य भाग आहे.

बिरसा मुंडा यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी भारत सरकारने त्यांच्या जयंतीचा दिवस १५ नोव्हेंबर हा २०२१ पासून 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवसाचे महत्त्व केवळ एका महान क्रांतिकारकाच्या स्मरणापुरते मर्यादित नाही. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी समाजाने दिलेल्या योगदानाची दखल घेणे, आदिवासी नायकांचा इतिहास पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे आणि त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक वारशाचा सन्मान करणे हा त्यामागील व्यापक उद्देश आहे. इतिहासाच्या मुख्य प्रवाहात अनेक आदिवासी क्रांतिकारकांच्या योगदानाला अपेक्षित स्थान मिळाले नाही. त्यामुळे त्यांच्या संघर्षाचा अभ्यास, दस्तऐवजीकरण आणि प्रसार करणे ही शैक्षणिक संस्था, संशोधक, साहित्यिक आणि प्रसारमाध्यमांची महत्त्वाची जबाबदारी आहे. आदिवासी इतिहासाकडे केवळ लोकसंस्कृती किंवा प्रादेशिक इतिहास म्हणून न पाहता भारतीय राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण योगदान म्हणून पाहिले पाहिजे.

आज बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करताना त्यांच्या विचारांचा प्रत्यक्ष जीवनात स्वीकार करण्याचा संकल्प करणे अधिक महत्त्वाचे आहे. आदिवासी समाजाच्या जमिनींचे संरक्षण, वनहक्कांची प्रभावी अंमलबजावणी, शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा, आर्थिक स्वावलंबन, सांस्कृतिक अस्मितेचे जतन आणि निर्णयप्रक्रियेतील सहभाग या बाबी केवळ सरकारी धोरणांचा भाग न राहता सामाजिक बांधिलकीचा विषय बनल्या पाहिजेत. आदिवासी समाजाच्या विकासाविषयीचे निर्णय घेताना त्यांचा आवाज, अनुभव आणि संमती यांना महत्त्व दिले पाहिजे. निसर्गाशी सहअस्तित्व राखणाऱ्या आदिवासी जीवनदृष्टीचा आदर करून शाश्वत विकासाची दिशा निश्चित केली पाहिजे. समाजातील कोणताही घटक विकासापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेणे हे लोकशाहीचे खरे यश आहे. बिरसा मुंडा यांनी पेटवलेली स्वाभिमानाची ज्योत आजही सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देत आहे. त्यांनी दाखवून दिले की, सामान्य माणसाच्या मनात निर्माण झालेली अन्यायाविरुद्धची जाणीव आणि संघटित संघर्षाची ताकद मोठ्या सत्तेलाही आव्हान देऊ शकते. त्यांच्या जीवनातून स्वातंत्र्याचा अर्थ केवळ राजकीय सत्तांतर नसून आर्थिक शोषणातून मुक्ती, सांस्कृतिक स्वायत्तता, सामाजिक प्रतिष्ठा आणि मानवी हक्कांचे संरक्षण हा असल्याचे स्पष्ट होते. त्यांच्या जयंतीनिमित्त आदिवासी समाजाच्या संघर्षाचा सन्मान करताना समताधिष्ठित, न्याय्य आणि संवेदनशील समाजनिर्मितीची जबाबदारी आपण सर्वांनी स्वीकारली पाहिजे. जल, जंगल आणि जमिनीवरील अधिकारांसाठी लढणाऱ्या या महान क्रांतिकारकाचे विचार पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हीच त्यांना वाहिलेली खरी आदरांजली ठरेल. बिरसा मुंडा यांचा स्वाभिमान, संघर्ष आणि सामाजिक परिवर्तनाचा विचार भारतीय समाजाला समता, न्याय आणि बंधुतेच्या दिशेने वाटचाल करण्याची सदैव प्रेरणा देत राहील.

– डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra5g-mail.com

जमिनीखालची बँक जपूया; भूजलाचा वापर काटकसरीने करूया!

महाराष्ट्र भूजल अधिनियम २००९ मधून भूजल संरक्षण, पुनर्भरण आणि सामूहिक जलव्यवस्थापनाला कायदेशीर आधार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कमी पर्जन्यमान आणि वारंवार उद्भवणाऱ्या दुष्काळी परिस्थितीमुळे सोलापूर जिल्ह्यात शेती, पिण्याचे पाणी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात भूजलावर अवलंबून आहे. मात्र, भूजलाचा बेसुमार उपसा आणि पुनर्भरणाकडे होणारे दुर्लक्ष यामुळे विहिरींची पाणीपातळी दिवसेंदिवस खालावत आहे. त्यामुळे भूजलाचे संरक्षण, काटकसरीने वापर आणि पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण ही काळाची गरज बनली आहे.

भूजलाला जमिनीखालील बँक असे म्हणता येईल. पावसाळ्यात या बँकेत पाणी जमा होते आणि वर्षभर त्याचा वापर केला जातो. मात्र, पाण्याचा जमा होणारा साठा कमी आणि उपसा जास्त झाला तर ही बँक रिकामी होण्यास वेळ लागत नाही. महत्त्वाचे म्हणजे भूजलाचा साठा हा केवळ एका शेतकऱ्याचा नसून संपूर्ण गावाचा सामाईक स्रोत आहे. सोलापूर जिल्ह्यात आढळणाऱ्या काळ्या बेसाल्ट खडकात पाणी मोठ्या तळ्यासारखे साठत नाही. ते खडकातील भेगा, झिजलेले थर आणि सूक्ष्म छिद्रांमध्ये साठते. अशा खडकांची पाणी साठविण्याची क्षमता साधारण एक ते तीन टक्केच असते. त्यामुळे एखाद्या विहिरीतून किंवा बोअरवेलमधून सातत्याने पाणी उपसा केल्यास आजूबाजूच्या विहिरींच्या पाणीपातळीवरही परिणाम होतो. अधिक खोल बोअरवेल घेण्याची स्पर्धा हा यावरचा उपाय नसून त्यामुळे खर्च वाढतो आणि भूजलसाठा अधिक वेगाने संपतो.

भूजल संरक्षणासाठी कायद्याचे बळ- भूजलाचा शाश्वत वापर आणि व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ लागू केला आहे. या कायद्याला २२ नोव्हेंबर २०१३ रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाली असून, १ जून २०१४ पासून तो राज्यात लागू आहे. बेसुमार भूजल उपसा रोखणे, सार्वजनिक पिण्याच्या



पाण्याचे स्रोत सुरक्षित ठेवणे, पाणी दूषित होण्यास प्रतिबंध करणे आणि लोकसहभागातून पाणलोट क्षेत्रनिहाय नियोजन करणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.

कायद्यानुसार अतिशोषित, शोषित किंवा पाणी दूषित झालेली क्षेत्रे शासनाकडून अधिसूचित करता येतात. अशा क्षेत्रांत विहिरींची नोंदणी आणि नवीन विहिरींच्या खोदकामावर तसेच पाणी उपशावर निर्बंध घालता येतात. गावातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचा स्रोत अधिसूचित केल्यानंतर त्याच्या ५०० मीटर परिसरात नवीन विहीर खोदण्यास मनाई करण्याची तरतूद आहे. आवश्यकतेनुसार तांत्रिक अभ्यासाच्या आधारे हा परिसर वाढविताही येतो. सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोताचे संरक्षण करण्याची महत्त्वाची जबाबदारी ग्राम पंचायतीवर आहे.

दुष्काळात पाणी उपशावर निर्बंध- पाणीटंचाई निर्माण झाल्यास संबंधित क्षेत्र पाणीटंचाई क्षेत्र म्हणून घोषित करता येते. अशा वेळी जिल्हा प्राधिकरण म्हणून उपविभागीय अधिकारी भूजल उपशावर निर्बंध घालू शकतात. आवश्यकतेनुसार काही विहिरींचा उपसा तात्पुरता बंद करण्याचे अधिकारही आहेत. यामुळे उभ्या फळबागांचे नुकसान झाल्यास संबंधित शेतकऱ्याला नुकसानभरपाई देण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. अधिसूचित क्षेत्रात पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती स्थापन केली जाते. या समितीत ग्रामपंचायत, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, कृषी, जलसंपदा आणि पाणीपुरवठा विभागांचे प्रतिनिधी सहभागी असतात. समितीत किमान एकतृतीयांश सदस्य महिला असणे आवश्यक आहे. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली गावाचा भूजल वापर आराखडा तयार करून दरवर्षी अद्ययावत केला जातो. यात अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांचे हित आणि पाण्याचे न्याय्य वाटप यांना प्राधान्य दिले जाते.

पुनर्भरणातून भूजलसाठा वाढविण्याची गरज- भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत पर्जन्यमान, भूजलपातळी, पाण्याचा उपसा, भूगर्भातील खडकांची रचना आणि पाण्याची गुणवत्ता यांचा अभ्यास केला जातो. पुनर्भरणासाठी योग्य जागा निश्चित करणे तसेच ग्रामपंचायतींना तांत्रिक मार्गदर्शन करणे ही यंत्रणेची महत्त्वाची कामे आहेत.

शेतकऱ्यांनी पाटाने पाणी देण्याऐवजी ठिबक व तुषार सिंचनाचा वापर करावा. शेततळी, बांधबंदिस्ती, नाला खोलीकरण, विहीर पुनर्भरण आणि घराच्या छतावरील पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासारखे उपाय करावेत. तसेच विहिरींच्या पाणीपातळीची दर महिन्याला नोंद ठेवावी. नवीन विहीर किंवा बोअरवेल खोदण्यापूर्वी आपला भाग अधिसूचित आहे का, याची ग्रामपंचायत किंवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून माहिती घ्यावी.

अधिसूचित क्षेत्रात नियमांचे उल्लंघन केल्यास पहिल्या वेळी कमाल १० हजार रुपये दंडाची तरतूद आहे. पुन्हा उल्लंघन केल्यास सहा महिन्यांपर्यंत कारावास किंवा कमाल २५ हजार रुपये दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

भूजल संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. शासनाने कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे, ग्रामपंचायतींनी ग्रामसभेत जलनियोजनाला प्राधान्य देणे आणि शेतकऱ्यांनी प्रत्येक थेंबाचा जपून वापर करणे आवश्यक आहे. आज आपण जपलेले पाणीच उद्याच्या पिढ्यांना उपलब्ध होणार आहे. त्यामुळे 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मंत्र प्रत्यक्ष कृतीत आणत भूजलाचा वापर मोजून, जपून आणि पुनर्भरण करून करणे गरजेचे आहे.

– डॉ. मुश्ताक अहमद शेख,
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (GSD), **सोलापूर**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

श्री पराग रमेश शिधये यांच्याकडून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीस ११ लाख रुपयांची देणगी



सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते देणगीदाराचा सत्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या धार्मिक, सामाजिक व विविध विकासात्मक उपक्रमांना हातभार लागावा, या भावनेतून पुणे येथील श्री पराग रमेश शिधये यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीस ११ लाख रुपयांची देणगी अर्पण केली.

यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते श्री पराग रमेश शिधये यांचा श्री विठ्ठल-रुक्मिणीची प्रतिमा व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या माध्यमातून भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे, मंदिर परिसराचा विकास, धार्मिक परंपरांचे जतन तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या कार्यासाठी भाविक व दानशूर व्यक्तींनी दिलेले योगदान मोलाचे ठरत आहे. श्री शिधये यांनी दिलेल्या या देणगीबद्दल मंदिर समितीच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी मंदिर समितीचे सदस्य श्री संभाजी शिंदे व कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव उपस्थित होते.

कृषी व अन्य शासकीय योजनांच्या लाभासाठी ई-केवायसी व फार्मर आयडी तातडीने तयार करावा

मदत व पुनर्वसन विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन; अडचणी सोडविण्यास राज्य शासन तत्पर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषीविषयक तसेच अन्य विभागांच्या योजनांचा लाभ थेट मिळावा, यासाठी ग्रीस्टॅक प्रणालीतील माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे. या प्रणालीच्या माध्यमातून कृषी व अन्य विभागांच्या विविध योजनांची मदत शेतकऱ्यांपर्यंत सातत्याने पोहोचविण्यात येत आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी आपली ई-केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करून फार्मर आयडी प्राप्त करून घ्यावा, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

शासनाच्या विविध योजनांमधून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य, अनुदान व अन्य लाभ देण्यात येतात. यापूर्वीही शासनाने विविध संकटांच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून दिली आहे. सध्या राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अग्रीम मदत देण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ई-केवायसी व फार्मर आयडीचे महत्त्व अधिक वाढले आहे. पात्र शेतकऱ्यांना मदतीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक नोंदणी व पडताळणी प्रक्रिया पूर्ण असणे गरजेचे आहे.

ॲग्रीस्टॅक प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची माहिती एकत्रित व अद्ययावत करण्यात येत असून, विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी ही माहिती उपयुक्त ठरत आहे. शेतकऱ्यांनी ई-केवायसी तसेच फार्मर आयडीची प्रक्रिया पूर्ण केल्यास योजनांचा लाभ मिळण्यातील अडचणी कमी होण्यास मदत होणार आहे.



ई-केवायसी किंवा फार्मर आयडी तयार करताना शेतकऱ्यांना काही तांत्रिक अथवा अन्य अडचणी येत असल्यास राज्य शासनामार्फत त्या सोडविण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल. शेतकऱ्यांनी कोणत्याही अडचणीमुळे प्रक्रिया अपूर्ण ठेवू नये. संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून आपली माहिती अद्ययावत करावी व आवश्यक पडताळणी पूर्ण करावी.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचावा, यासाठी ई-केवायसी व फार्मर आयडी पूर्ण करणे महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार करण्यासाठी जवळच्या सीएससी (नागरी सुविधा केंद्र) येथे आधार कार्ड व आधारशी संलग्न मोबाईल क्रमांकासह जाऊन फार्मर आयडी तयार करून घ्यावा. राज्यातील शेतकऱ्यांनी या प्रक्रियेला प्राधान्य देऊन तातडीने पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाने केले आहे.

उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे श्वास अभियान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालय नाशिक येथील कार्यरत डॉ शिंपी यांच्या आदेशानुसार तसेच उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील कार्यरत वैद्यकीय अधिक्षक डॉ राजीव तांभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली बालकांमधील निमोनिया आजाराचे प्रभावी नियंत्रण करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाची सुरुवात धन्वंतरी मातेच्या पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली आहे. या प्रसंगी तालुका आरोग्य अधिकारी डॉ सुजित कोशिरे आपल्या प्रस्तावनेत म्हटले की की भारत सरकारच्या आरोग्य व ७कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत २०१९ पासून हे अभियान राबविण्यात येत आहे. प्रामुख्याने ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना निमोनियापासून संरक्षण देणे, वेळेवर निदान करणे आणि मृत्यूदर कमी करणे हा या अभियानाचा उद्देश असून फुफ्फुसांचा संसर्गजन्य आजार आहे. या आजारामध्ये फुफ्फुसातील हवेच्या पिशव्यांना सूज येते आणि त्यामध्ये पाणी किंवा पू जमा होऊ शकतो.

बाल निमोनिया आजार, लसीकरण व प्रतिबंधात्मक उपाय

यामुळे बालकाला श्वास घेण्यास त्रास होतो.निमोनियाची प्रमुख लक्षणे बालकांमध्ये खालील लक्षणे दिसून येऊ शकतात.

खोकला येणे. ताप येणे. श्वास जलद चालणे. श्वास घेताना छातीचा खालचा भाग आत ओढला जाणे. दूध पिण्यास त्रास होणे. भूक कमी होणे. बालक सुस्त होणे किंवा हालचाल कमी करणे. श्वास घेताना घरघर किंवा आवाज येणे. आदी बाबत माहिती दिली.

वैद्यकीय अधिक्षक यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

निमोनियापासून संरक्षणासाठी ही अत्यंत महत्त्वाची लस आहे. ही लस न्यूमोकोकल जिवाणूमुळे होणाऱ्या गंभीर संसर्गापासून संरक्षण देते.

बालकाचे वय, लसीकरण, ६ आठवडे, झउत पहिला डोस, १४ आठवडे, झउत दुसरा डोस, ९ ते १२ महिने, झउत बूस्टर डोस

ही लस शासकीय लसीकरण कार्यक्रमांतर्गत पात्र बालकांना मोफत दिली जाते. तसेच निमोनियापासून बचाव करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाया बाबत बोलतांना म्हणाले की जन्मानंतर शक्यतो एका तासाच्या आत स्तनपान सुरू करावे. पहिले सहा महिने केवळ आईचे दूध द्यावे. सहा महिन्यांनंतर पूरक आहार सुरू करून स्तनपान दोन वर्षे किंवा त्यापुढे सुरू ठेवावे. बालकाचे नियमित लसीकरण पूर्ण करावे. हात साबणाने स्वच्छ धुवावेत. घरात धूम्रपान करू नये. बालकाला धूळ व धुरापासून दूर ठेवावे. बालकाला पुरेसा आणि पौष्टिक आहार द्यावा.

आजाराची लक्षणे दिसल्यास त्वरित आरोग्य संस्थेत उपचार घ्यावेत. शेवटीं अभियानांतर्गत आरोग्य विभागाची भूमिका या अभियानामध्ये आरोग्य विभाग, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, समुदाय आरोग्य अधिकारी आणि वैद्यकीय अधिकारी यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहणार आहे त्यात त्यांचे प्रमुख काम असणार आहे की ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांच्या पालकांमध्ये जनजागृती करणे. निमोनियाची लक्षणे व धोक्याची चिन्हे समजावून सांगणे. बालकांचे नियमित लसीकरण पूर्ण करून घेणे. कुपोषित बालकांची विशेष काळजी घेणे. स्तनपान व पोषणविषयक मार्गदर्शन करणे.



निमोनियाचे लवकर निदान व योग्य उपचार करणे.

गंभीर बालकांना तातडीने उच्चस्तरीय रुग्णालयात संदर्भित करणे हि महत्वाची माहिती दिली कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन नितीन परदेशी यांनी मानले तसेच या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सह नियंत्रण व सल्लागार समिती सदस्य म्हणून मधुकर शेलार, सागर कुंदे, दिलीप कापसे व सुवर्णा लुकंड उपस्थित होते तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

चार वर्षांपासून बंद रस्ता सुरू करण्यासाठी माजी सरपंचाचा उपोषणाचा इशारा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी

वेळापूर ता. निफाड येथील गावात जाण्या-येण्यासाठी असलेला रस्ता २०२२ पासून बंद करण्यात आल्याने ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत आहे. हा रस्ता पूर्ववत सुरू करण्यासाठी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कार्यवाही होत नसल्याचा आरोप करत माजी सरपंच केदू श्रीपत शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. मागणीची दखल न घेतल्यास २१ नोव्हेंबर २०२६ पासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

निवेदनानुसार, वेळापूर गावातील कायम स्वरूपी रहिवासी असलेल्या शिंदे यांच्या म्हणण्यानुसार, गावात जाण्यासाठी शासनाने पक्का रस्ता तयार केलेला होता काही व्यक्तींनी रस्त्याचे नुकसान केले व येजा बंद केली. याप्रकरणी निफाड न्यायालयातही तक्रार दाखल करण्यात आली आहे.

वेळापूर येथील ग्रामस्थांची गैरसोय; प्रशासनाकडे तक्रार करूनही कार्यवाही नसल्याचा आरोप

लासलगाव मंडळ अधिकारी यांना या प्रकरणाची माहिती असून, त्यांनी संबंधितांना नोटीस देवूनही रस्ता सुरू करण्याबाबत ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

शिंदे यांनी ग्रामपंचायतीकडेही याबाबत दाद मागितली आहे. मात्र ग्रामपंचायतीकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने रस्त्याच्या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली आहे. रस्त्याबाबत वस्तुस्थितीची पाहणी करून तो पूर्ववत सुरू करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या निवेदनाच्या प्रती निफाडचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, लासलगाव मंडळ अधिकारी, लासलगाव पोलीस निरीक्षक, वेळापूर तलाठी आणि ग्रामपंचायत प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

प्रभाग १७ मधील बडवेंचर झोपडपट्टीतील रस्त्याच्या कामाची भूमिपूजन



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/पंढरपूर

पंढरपूर शहरातील प्रभाग क्रमांक १७ मधील बडवे सर झोपडपट्टी परिसरातील नागरिकांची अनेक दिवसापासून ची रस्त्याची समस्या आता मार्गी लागणार आहे. या परिसरातील सिमेंट काँक्रिट रस्त्याची रस्त्याचे कामाची भूमिपूजन क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीचे औचित्य साधून मनसेने ते दिलीप बापू धोत्रे, नगराध्यक्ष डॉक्टर सौ प्रणिता ताई भालके, नगरसेविका तथा स्थायी समिती सदस्य सौ माधवी दिलीप धोत्रे, नगरसेवक लोकेश यादव यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी माजी नगरसेवक नागेश यादव श्रीमंत यादव दुर्योधन यादव, दीपक नाईक नवरे दिनेश पांढरे, भाऊसाहेब कांबळे नाथा यादव प्रसाद यादव, निलेश माने, राजू देवकुळे संतोष वाघमारे, नागेश खरात अंबादास वायदंडे, यांच्या सह परिसरातील नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाविकांसाठी भक्तीसागर येथे ७२५ प्लॉटस उपलब्ध

प्रांताधिकारी सचिन इथापे

कार्तिक यात्रा सोहळा; पालखी सोहळा, दिंडीधारकांनी प्लॉटसची मागणी नोंदवावी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/पंढरपूर : कार्तिक यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि. २१ नोव्हेंबर २०२६ रोजी असून, यात्रा कालावधी १० ते २४ नोव्हेंबर २०२६ असा आहे. या यात्रेत येणाऱ्या दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या ठिकाणी मोफत प्लॉटस भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत आहेत. दि.१४ नोव्हेंबर पासून प्लॉट नोंदणी सुरु करण्यात आली आहे. संबधितांनी भक्तीसागर येथे प्लॉटची मागणी नोंदवावी, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे.

कार्तिक यात्रेला येणाऱ्या पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (६५ एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन,



अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात.. या ठिकाणी एकूण ७२५ प्लॉट्स उपलब्ध असून, सदर प्लॉट भाविकांना निवाऱ्यासाठी दिले जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते. येथे प्रशासकीय यंत्रणा सुसज्ज व सुरळीतपणे काम करण्यासाठी तहसीलदार सचिन मुळीक यांची सेक्टर मॅनेजर म्हणून नियुक्ती केली आहे.भाविकांना प्लॉटस वाटप करणे, अडीअडचणी सोडवणे, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व त्यावर नियुक्त सेक्टर मॅनेजर व त्याचे अधिनस्त कर्मचारी कार्यान्वित असणार आहेत.

दिंडी, पालखी समवेत येणाऱ्या भाविकांना भक्तीसागर ६५ एकर येथे प्लॉटसचे वाटप करण्यात येणार आहे. आषाढी एकदशीच्या सोहळ्या अगोदर दिंडी, पालखीतील भाविकांने प्लॉटसाठी मागणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रथम येणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या ठिकाणी भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार असून आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार सुधाकर धाईंजे (मो.क्र.९७६७२४८२१०), तसेच ग्राम महसूल अधिकारी दादासाहेब पाटोळे (मो.क्र.९९७०१०९९१९), प्रमोद खंडागळे (मो.क्र. ९६५७२९०४०३) तसेच वैभव कट्टे (मो.क्र.९६६५०७६०६६) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

परिवहन विभागाच्या प्रशासकीय अधिकारी यांच्या बेजबाबदार कार्यपद्धतीची चौकशी करून कारवाई करण्याचे मुख्यमंत्री सचिवालयाचे आदेश!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे/प्रतिनिधी : परिवहन विभागाच्या प्रशासकीय अधिकारी पदावर कार्यरत असणाऱ्या हस्तपणा कर्मचारी हा विभाग सांभाळणाऱ्या संस्कृती राणे ह्या परिवहन आयुक्त कार्यालय मुंबई येथे कार्यरत असल्यामुळे त्यांच्या बेजबाबदार नियमबाह्य माहिती अधिकाराचा संकोच न्यायालयीन कामकाजात दिरंगाई इत्यादी संदर्भात भिवंडीतील मनसे महिला अध्यक्ष दीक्षिता वसईकर यांनी मुख्यमंत्री सचिवालय कक्ष कोकण भवन येथे तक्रारी निवेदन सादर केले होते.

सदर तक्रारीत म्हणणे सादर केल्यानुसार माहिती अधिकारात मागितलेली माहिती उपलब्ध नाही अशी दिशा उत्तरे देणे, काम ताजात पारदर्शकता नसणे माहिती उपलब्ध नाही अशी दिशाभूल करणारे उत्तर देणे आणि पर्यायी माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन इत्यादी बाबी निदर्शनास आले आहेत असे निवेदनकर्त्याने आपल्या निवेदनात नमूद केले आहे. तसेच न्यायालयात दाखल असलेल्या प्रकरणांमध्ये प्रचंड हलगर्जीपणा वेळेत शपथपत्र साधरण करणे त्यामुळे शासनाच्या कामाची आणि प्रतिष्ठेची मालिनता, कार्यालयीन उत्तरदायित्वाचे सरळ सरळ उल्लंघन इत्यादी बाबींचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर प्रशासकीय अधिकारी संस्कृती राणे यांच्या कार्यकाळातील कामाचे विधिविषयक लेखापरीक्षण होणे गरजेचे आहे तसेच आस्थापनेतील कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींची देखील दिरंगाई चालकल इत्यादीमुळे कर्मचाऱ्यांचे सेवाविषयक नुकसान केल्याचे लक्षात घेऊन संबंधित प्रशासकीय अधिकारी संस्कृती राणे, यांच्यावर कारवाई व्हावी. याबाबतच्या निवेदनाचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री सचिवालय कक्षाने परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई या कार्यालयास चौकशी निहाय कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत सबब संदर्भीय गंभीर बाबींची दखल घेता परिवहन आयुक्त कार्यालय याबाबत नेमके कोणते कारवाईचे सूत्र हाती घेते याबाबत निवेदन करता तसेच आस्थापनातील अधिकारी कर्मचारी यांचे लक्ष लागले आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांची प्रसार माध्यम प्रतिनिधींनी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

विश्वकर्मा फाउंडेशनचा स्तुत्य सामाजिक उपक्रम; शासकीय योजनांसाठी आवश्यक कार्डांचे मोफत वाटप!

सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक बचत आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विश्वकर्मा फाउंडेशनचा पुढाकार; मान्यवरांकडून उपक्रमाचे कौतुक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/प्रतिनिधी

शासनाच्या विविध कल्याणकारी योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचाव्यात, तसेच या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारी विविध कार्डे व कागदपत्रे नागरिकांना कोणत्याही आर्थिक भुर्दंडाशिवाय उपलब्ध व्हावीत, या सामाजिक उद्देशाने विश्वकर्मा फाउंडेशनच्या वतीने शासकीय योजनांसाठी आवश्यक कार्डांचे मोफत वाटप करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला उपस्थित मान्यवरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे विशेष कौतुक केले.

या उपक्रमाचे उद्घाटन ओबीसी महामंडळाचे सहाय्यक संचालक श्री. गणेश सोनटक्के, आमदार देवेंद्र कोठे यांचे स्वीय सहाय्यक श्री. शैलेश कडदास, आमदार समाधान आवताडे यांचे स्वीय सहाय्यक श्री. श्रीकांत माळगे, सामाजिक कार्यकर्ते श्री. प्रशांत बडवे आणि विश्वकर्मा फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. संतोष गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक थांबविण्याचा प्रयत्न – संतोष गायकवाड

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विश्वकर्मा फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. संतोष गायकवाड यांनी संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी एका व्यक्तीला अनेक प्रकारची कार्डे आणि कागदपत्रांची आवश्यकता असते. संपूर्ण कुटुंबाचा विचार केला, तर ही कागदपत्रे तयार करण्यासाठी नागरिकांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक खर्च करावा लागतो. अनेकदा काही एजंट नागरिकांना चुकीची माहिती देऊन त्यांच्याकडून अवाजवी पैसे आकारतात. काही वेळा पैसे घेऊनही कामाला विलंब केला जातो, तर काही नागरिकांची कामे पूर्णदेखील होत नाहीत.

ही परिस्थिती लक्षात घेऊन सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक बचत व्हावी, त्यांची गैरसोय टळावी आणि शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सहज उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने विश्वकर्मा फाउंडेशनच्या वतीने विविध कार्डे मोफत काढून देण्याचा उपक्रम हाती घेण्यात आल्याचे संतोष गायकवाड यांनी सांगितले.

शासनाने राबवायचा उपक्रम विश्वकर्मा फाउंडेशन राबवत आहे – गणेश सोनटक्के

उद्घाटनपर भाषणात ओबीसी महामंडळाचे सहाय्यक संचालक श्री. गणेश सोनटक्के यांनी विश्वकर्मा फाउंडेशनच्या कार्याचे विशेष कौतुक केले.





ते म्हणाले, शासन आपल्या दारी या संकल्पनेतून नागरिकांना विविध शासकीय सेवांचा लाभ उपलब्ध करून देण्याचे काम शासन आणि संबंधित विभागांकडून केले जाते. मात्र अशाच स्वरूपाचा लोकाभिमुख उपक्रम विश्वकर्मा फाउंडेशनसारखी सामाजिक संस्था स्वतः पुढाकार घेऊन राबवत आहे, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे.

अशा उपक्रमांमुळे शासनाच्या योजना आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यातील अंतर कमी होण्यास मदत होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

आवश्यक कागदपत्रांअभावी नागरिकांची कामे रखडतात – शैलेश कडदास

आमदार देवेंद्र कोठे यांचे स्वीय सहाय्यक श्री. शैलेश कडदास यांनी सांगितले की, अनेक नागरिक विविध शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी तसेच शासकीय मदतीसाठी लोकप्रतिनिधींच्या कार्यालयात येत असतात. मात्र त्यांच्याकडे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे त्यांना तातडीने मदत करणे अनेकदा कठीण होते. परिणामी त्यांच्या कामांना विलंब होतो.

नागरिकांना आवश्यक कार्डे आणि कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण काम विश्वकर्मा फाउंडेशन करत आहे. त्यामुळे शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याच्या प्रक्रियेत नागरिकांना मोठी मदत होणार आहे, असे सांगत त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

महिलांनी संघटित होऊन उपक्रमाचा लाभ घ्यावा – श्रीकांत माळगे

आमदार समाधान आवताडे यांचे स्वीय सहाय्यक श्री. श्रीकांत माळगे यांनी आपल्या मनोगतात महिलांना विशेष आवाहन केले.

महिलांनी संघटित होऊन अशा सामाजिक उपक्रमांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. त्याचबरोबर आपल्या परिसरातील इतर महिला, गरजू कुटुंबे आणि नागरिकांपर्यंत या उपक्रमाची माहिती पोहोचवावी. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत अशा उपक्रमांचा लाभ पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

विश्वकर्मा फाउंडेशनचे कार्य समाजासाठी दिशादर्शक – प्रशांत बडवे

सामाजिक कार्यकर्ते श्री. प्रशांत बडवे यांनी आपल्या मनोगतात विश्वकर्मा फाउंडेशनच्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्याचा गौरव केला.

विश्वकर्मा फाउंडेशनचे सामाजिक कार्य मी जवळून पाहत आहे. संस्थेच्या वतीने सातत्याने सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे आणि समाजाला उपयोगी पडणारे विविध उपक्रम राबविण्यात येतात. केवळ कार्यक्रम घेण्यापुरते मर्यादित न राहता नागरिकांच्या प्रत्यक्ष अडचणी समजून घेऊन त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न ही संस्था करत असते. शासकीय योजनांसाठी आवश्यक कार्डे मोफत उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम त्याचेच उत्तम उदाहरण आहे, असे त्यांनी सांगितले.

अशा उपक्रमांची माहिती केवळ उपस्थितांपुरती मर्यादित न राहता जास्तीत जास्त गरजू नागरिकांपर्यंत पोहोचली पाहिजे. विशेषतः उपस्थित महिलांनी आपल्या परिसरातील इतर महिलांना आणि कुटुंबांना या उपक्रमाची माहिती द्यावी, असे आवाहनही प्रशांत बडवे यांनी केले.

नागरिकांकडून समाधान; सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक

शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक असणारी विविध कार्डे मोफत उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमामुळे सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक बचत होण्यास मदत झाली. तसेच आवश्यक कागदपत्रे मिळविण्यासाठी होणारी धावपळ आणि गैरसोय कमी होण्यासही हातभार लागला.

उपस्थित नागरिकांनी विश्वकर्मा फाउंडेशनच्या या सामाजिक उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत संस्थेचे आभार मानले. अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्यात यावेत, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे परिश्रम

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वकर्मा फाउंडेशनचे संचालक श्री. चंद्रशेखर सुतार यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. रेखा केंगार यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. राकेश गायकवाड, श्री. श्रीकृष्ण गायकवाड, सौ. अनिता ऐवळे आणि सौ. लक्ष्मी शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

शासनाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी केवळ योजना जाहीर होणे पुरेसे नसते, तर त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रेही सहज आणि परवडणाऱ्या पद्धतीने उपलब्ध होणे तितकेच महत्त्वाचे असते. हीच सामाजिक गरज ओळखून विश्वकर्मा फाउंडेशनने राबविलेला उपक्रम सर्वसामान्य नागरिकांसाठी निश्चितच दिलासादायक आहे

मनोजदादा जरांगे पाटील यांचे नळदुर्ग येथे जंगी स्वागत



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी (प्रतिनिधी) : गरीब कुणबी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गामध्ये आरक्षण मिळावे या मागणीसाठी संघर्ष करणारे मराठा आरक्षणाचे संघर्ष नायक मनोज दादा जरांगे पाटील यांचा नळदुर्ग ता.तुळजापूर येथे बस स्थानकासमोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात रिपाइं (आठवले)च्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून येथील उपेक्षित बहुजन समाजला एस.सी. एस.टी. ओबीसी प्रवर्गात घटनात्मक आरक्षणाची तरतूद केलेली आहे. या मूळ आरक्षणाला धक्का न लावता गरीब कुणबी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गामध्ये आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज दादा जरांगे पाटील हे गेल्या अनेक दिवसापासून आंदोलन करत आहेत.या आंदोलनातून मराठा आरक्षणाचे संघर्ष नायक म्हणून त्यांची संबंध देशभरात ओळख निर्माण झाली आहे .

दि.१४ नोव्हेंबर २०२६ रोजी तुळजापूर- नळदुर्ग मार्गे उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा अनावरण कार्यक्रमासाठी जात असताना नळदुर्ग येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन मनोज दादा जरांगे पाटील यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

प्रारंभी मनोज दादा जरांगे पाटील यांनी येथील संविधान चौकातील नाम पलकास पुष्प वाहून अभिवादन केले यावेळी रिपाइं (आठवले) चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जिल्हा सचिव एस.के.गायकवाड,रिपाइं चे नळदुर्ग सर्कल प्रमुख राजेंद्र शिंदे सह समविचारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तर संघर्ष नायक मनोज दादा जरांगे पाटील यांचे नळदुर्ग नगरीत प्रवेश करताना मानेवाडी पाटील येथे ही भाजपा मीडिया सेल चे तालुका अध्यक्ष किशोर धुमाळ,भाजपाचे अंगद जाधव सह कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले.

छटपूजा पर्यावरणपूरक पद्धतीने साजरी करा! नदीपात्रात उतरून पूजा करण्यास महापालिकेची मनाई



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे

उल्हासनगर : छटपूजेच्या पवित्र सणाच्या पार्श्वभूमीवर उल्हासनगर महानगरपालिकेने शहरातील सर्व भाविकांना पर्यावरणपूरक पद्धतीने छटपूजा साजरी करण्याचे आवाहन केले आहे. श्रद्धा, भक्ती आणि निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा सण साजरा करताना नदी, तलाव आणि नैसर्गिक जलस्रोतांचे प्रदूषण होणार नाही, याची प्रत्येक भाविकाने काळजी घ्यावी, असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

छटपूजेच्या धार्मिक महत्त्वाचा आणि भाविकांच्या श्रद्धेचा आदर राखून महानगरपालिकेने पर्यावरणपूरक पद्धतीने पूजा करण्यासाठी परवानगी दिली आहे. मात्र, नदीपात्रात उतरून छटपूजा करण्यास मनाई करण्यात आली आहे.

त्यामुळे भाविकांनी नदीपात्रात न उतरता प्रशासनाने निश्चित केलेल्या जागेवरूनच आपले धार्मिक विधी पार पाडावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच छटपूजेच्या वेळी नदी व जलस्रोतांमध्ये प्लास्टिक, निर्माल्य, पूजेचे साहित्य, फुले, फळे अथवा इतर कचरा टाकू नये. पूजेनंतर निर्माण होणारा कचरा निर्धारित निर्माल्य कलशामध्येच टाकावा. जलचर सृष्टी आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असेही महापालिकेने सांगितले आहे. 'आपली श्रद्धा जपूया, निसर्गाचेही रक्षण करूया!' या संदेशासह छटपूजेचा सण आनंदाने, भक्तिभावाने आणि पर्यावरणाची काळजी घेऊन साजरा करण्याचे आवाहन उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

डोळ्यांत अपूर्ण स्वप्ने नियतीने हिरावले, बालपणाचे सुख माणुसकीने दिला जगण्याचा नवा विश्वास!

शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांतील चिमुकल्यांचा निफाड एज्युकेशन अँड सोशल फाउंडेशनच्या वतीने आधारतीर्थ आश्रमशाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : काही लेकरांच्या नशिबी वडिलांचा हात धरून चालण्याचे सुख नसते काहींच्या डोक्यावर वडिलांचे छत्र नियती हिरावून घेते. वडिलांच्या मायेची उणीव कोणतीही गोष्ट भरून काढू शकत नाही; मात्र अशा निरागस जीवांच्या डोक्यावर मायेचा हात ठेवून त्यांना जगण्याचे बळ देणे, हीच खरी माणुसकी असून निफाड एज्युकेशन अँड सोशल फाउंडेशन आणि श्रीराम क्लासेस, निफाड** यांच्या वतीने नाशिक येथील आधारतीर्थ आश्रम शाळेत भेट देण्यात आली असून. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले



शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या जवळ बसून त्यांच्याशी संवाद साधत, त्यांच्या भावना जाणून घेतल्या, त्यांच्या शिक्षणाची आणि भविष्यातील स्वप्नांची आस्थेने विचारपूस केली. त्या चिमुकल्यांच्या निरागस चेहऱ्यावरील हास्य, डोळ्यांतील चमक आणि हातात मिळालेल्या शैक्षणिक साहित्याकडे पाहताना उमटलेला आनंद या भेटीचे खरे समाधान होते.

आधारतीर्थ आश्रमशाळा ही शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांतील मुला-मुलींच्या संगोपन, शिक्षण आणि उज्ज्वल भविष्यासाठी कार्य करणारी संवेदनशील संस्था आहे. आयुष्यातील मोठा आधार हरवलेल्या या बालकांना शिक्षणाबरोबरच प्रेम, सुरक्षितता, आपलेपणा आणि आत्मविश्वास मिळावा, यासाठी येथे प्रयत्न केले जातात. निफाड एज्युकेशन अँड सोशल फाउंडेशनचे संस्थापक तथा संचालक प्रा. उल्हास पाटील आणि संचालिका प्रा. सौ. सविता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक कार्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचा संस्थेचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे या उपक्रमात श्रीराम क्लासेसच्या शिक्षकवृंदाने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्वांनी एकत्र येत या विद्यार्थ्यांप्रती आपुलकी व्यक्त केली आणि त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला शुभेच्छा दिल्या.

आपण त्यांच्या आयुष्यातील वडिलांची उणीव भरून काढू शकत नाही त्यांच्या वेदना पुसून टाकू शकत नाही पण त्यांच्या स्वप्नांना आधार देणारा हात नक्कीच बनू शकतो!

कारण, एखाद्या लेकराच्या हातात शैक्षणिक साहित्य देताना आपण प्रत्यक्षात त्याच्या हातात भविष्याची आशा देत असतो. त्यांच्या डोळ्यांतील स्वप्नांना बळ देत असतो आणि त्यांच्या मनात जगण्याचा नवा विश्वास पेरत असतो त्यांच्या पाठीशी उभे राहाने, हाच या उपक्रमाचा खरा संदेश आहे.

या उपक्रमासाठी निफाड एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष दिगंबर पाटील सदस्य अशोक पानगव्हाणे , किरण पानगव्हाणे ,मंगला ढगे यांचे मार्गदर्शन लाभले.